२८०।१५

**संदर्भ:-** संचालनलायाचे पत्र क्र. स्था.१८/ब/ग्रापं / अे अे २/न.क्र.१०८ /१९१३, दि. २९.०९.२०१६

**संचालनालय, स्थानिक निधी लेखापरीक्षा,**
**महाराष्ट्र राज्य,**
**कोकण भवन, ६ वा मजला,**
**नवी मुंबई - ४०० ६१४.**

**13 OCT 2016**

**कार्यालयीन आदेश क्र. ०५ / सन २०१६-१७, दिनांक:**

विषय:- ग्रामपंचायत लेखापरीक्षण सन २०१५-१६ बाबत.

जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या सन २०१५-१६ च्या लेखापरीक्षणाबरोबर ग्रामपंचायतींच्या सन २०१५-१६ चे लेखापरीक्षण हाती घेण्यास संचालनालयाने संदर्भिय पत्राद्वारे मान्यता दिलेली आहे.

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम १४० नुसार ग्रामपंचायतींचे लेखापरीक्षण संपल्यानंतर दोन महिन्याचे आत लेखापरीक्षण अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत समिती आणि ग्रामपंचायतींकडे पाठविणे आवश्यक आहे. ग्रामपंचायतींच्या सन २००७-०८ ते २०१४-१५ पर्यंतच्या ग्रामपंचायत लेखापरीक्षण अहवाल निर्गमनाची प्रलंबितता पाहता या संचालनालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, बहुतांश लेखापरीक्षक ग्रामपंचायतींचे लेखापरीक्षण अहवाल विहित मुदतीत संबंधित जिल्हा कार्यालयास सादर करीत नाहीत.

यास्तव आपणास कळविण्यात येते की, लेखापरीक्षकांनी एखादया महिन्यात पुर्ण केलेल्या ग्रामपंचायत घटकांपैकी ५० टक्के ग्रामपंचायत घटकांचे लेखापरीक्षण अहवाल पुढील महिन्याच्या ०१ किंवा ०२ तारखेस संबंधित जिल्हा कार्यालयास सादर करणे अनिवार्य आहे. तसेच उर्वरीत ५० टक्के ग्रामपंचायत घटकांचे लेखापरीक्षण अहवाल त्यापुढील महिन्याच्या ०१ किंवा ०२ तारखेस कार्यालयास सादर करावेत.

उदा. 'अ ' लेखापरीक्षकाने माहे ऑक्टोबर २०१६ मध्ये १० ग्रामपंचायत घटकांचे लेखापरीक्षण पुर्ण केल्यास माहे नोव्हेंबर २०१६ च्या ०१ किंवा ०२ तारखेस ५ ग्रामपंचायत घटकांचे लेखापरीक्षण अहवाल कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे व उर्वरीत ५ ग्रामपंचायत घटकांचे लेखापरीक्षण अहवाल माहे डिसेंबर २०१६ च्या ०१ किंवा ०२ तारखेस कार्यालयास सादर करावेत.

जे लेखापरीक्षक या आदेशानुसार ग्रामपंचायत लेखापरीक्षण अहवाल कार्यालयास विहित मुदतीत सादर करणार नाहीत, अशा लेखापरीक्षकांना **जिल्हा सहाय्यक संचालक** यांनी पुढील महिन्यामध्ये कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थेचे लेखापरीक्षणाचे कामकाज देऊ नये.

या आदेशाचे काटेकोरपणे पालन होईल, असे पहावे.

(प्रताप मोहिते)
संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
महाराष्ट्र राज्य.

प्रति,

सहाय्यक संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
(सर्व जिल्हे).

प्रत:- सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा,कोंकण / पुणे /नाशिक /औरंगाबाद / अमरावती /नागपुर यांना पुढील कार्यवाहीस्तव.

D/letters/vp letters/१३.१०.२०१६